स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**

**सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२**

**Website** :www.doa.maharashtra.gov.in Email:dirdoa.mum-mah@gov.in/ directorateofart@gmail.com/ higherartexam@gmail.com

क्रमांक- डिओओ/२०२३/चार/ 1589 दिनांक :- 9 JUN 2023

संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र.एडीआर-२०२३/प्र.क्र.५७/तांशि-६, दिनांक ०८ जून, २०२३.

२) कला संचालनालयाचे परिपत्रक क्र.डिओओ-२०२३/चार/१५६८, दिनांक ०८ जून, २०२३.

## परिपत्रक

[शासकीय उच्चकला परीक्षा- २०२३ पुन:श्च आयोजित करण्याबाबत.]

विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला संस्थांनी शासकीय उच्चकला परीक्षा २०२३ वरील बहिष्कार मागे घेतल्याने संदर्भिय क्र. १ वरील शासन पत्रान्वये कळविल्यानुसार कला संचालनालयामार्फत दिनांक २१ जून, २०२३ ते ३१ जूलै, २०२३ या कालावधीत शासकीय उच्चकला परीक्षा २०२३ चे पुन:श्च आयोजन करण्यात येत आहे. परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक उच्चकला परीक्षेच्या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

ज्या कला संस्थांनी यापूर्वी आयोजित केलेल्या उच्चकला परीक्षे दरम्यान विद्यार्थ्यांचा दैनंदिन उपस्थिती अहवाल संचालनालयास सादर केला नाही तसेच ज्या कला संस्थांनी परीक्षा शुल्क अदा केले नाही, अशा कला संस्थांमधील नोंदणीकृत विद्यार्थ्यांना शासकीय उच्चकला परीक्षा २०२३ च्या पुनश्च परीक्षेस बसणे आवश्यक राहील.

**परीक्षा केंद्र :**

सोबतच्या वेळापत्रकानुसार ३ शासकीय व ३१ अनुदानित कला संस्थांवर/परीक्षा केंद्रांवर सदर परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. अशा एकुण ३४ परीक्षा केंद्रांबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. सदर परीक्षा केंद्रांच्या यादीतील परीक्षा केंद्रांच्या नावासमोर संबंधित केंद्रामध्ये परीक्षेकरिता समाविष्ट करण्यात आलेल्या सहभागी कला संस्थांची नावे नमुद येतील. त्यानुसार, सहभागी कला संस्थांनी आपले विद्यार्थी संबंधित परीक्षा केंद्रावर परीक्षेस बसवावे. त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षेचे वेळापत्रक व परीक्षा केंद्राचे ठिकाण तात्काळ अवगत करावे.

सहभागी कला संस्थांनी त्यांच्या कला संस्थेतील अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थ्यांच्या आसन क्रमांकाच्या यादीची एक प्रत संबंधित परीक्षा केंद्राकडे जमा करावी. त्याचप्रमाणे या कार्यालयाकडून आपणास यापूर्वी पाठविण्यात आलेल्या सैध्दांतिक विषयाच्या उत्तरपत्रिका संबंधित परीक्षा केंद्रावर जमा कराव्यात.

**परीक्षा शुल्क :**

अभ्यासक्रमनिहाय प्रतिविद्यार्थी विहित करण्यात आलेल्या परीक्षा शुल्काचा तक्ता सोबत जोडला असून त्यानुसार सहभागी कला संस्थांनी नोंदणीकृत विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाईन पध्दतीने दिनांक १९ जून, २०२३ पर्यंत जमा करावे. **ज्या कला संस्थांनी यापूर्वी अभ्यासक्रमनिहाय प्रतिविद्यार्थी ७० % प्रमाणे परीक्षा शुल्काचा भरणा केलेला आहे, परंतू, विद्यार्थ्यांचा दैनंदिन उपस्थिती अहवाल सादर केलेला नाही, अशा कला संस्थांनी उर्वरीत ३०% रक्कम धनाकर्षाद्वारे (डिमांड ड्राफ्ट) संचालनालयाकडे जमा करावी.** ज्या कला संस्था नोंदणीकृत विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क विहित कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अदा करणार नाहीत, अशा कला संस्थांमधील विद्यार्थ्यांची परीक्षा आयोजित करण्यात येणार नाही आणि त्यास संबंधित कला संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील, याची प्राचार्यांनी नोंद घ्यावी.

**परीक्षेचे स्वरुप :**

सदर परीक्षा मौखिक, सैध्दांतिक व प्रात्यक्षिक स्वरुपात संपुर्णत: ऑफलाईन पध्दतीने आयोजित करण्यात येतील. मौखिक विषयांची परीक्षा कला संस्था स्तरावर प्राचार्यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीमार्फत घेण्यात येऊन गुणदान करण्यात यावे. त्याकरिता अभ्यासक्रमनिहाय गुणतक्ते परीक्षा लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सैध्दांतिक व प्रात्यक्षिक विषयांची परीक्षा वरील नमुद परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात येईल.

**परीक्षा केंद्रांना सुचना :**

परीक्षा केंद्रांचे अधिष्ठाता/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे पुनश्च आयोजित करण्यात येणाऱ्या शासकीय उच्चकला परीक्षा २०२३ च्या गोपनीय प्रश्नपत्रिका अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉग इनवर उपलब्ध करुन देण्यात येतील. अभ्यासक्रमनिहाय विद्यार्थी संख्येनुसार गोपनीयरित्या प्राप्त होणाऱ्या प्रश्नपत्रिकांच्या प्रिंट आऊट काढून आपल्या अभिरक्षेत ठेवाव्यात व गोपनीयतेचा भंग होणार नाही याबाबतची दक्षता घेऊन वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याच्या अनुषंगाने उचित कार्यवाही करावी. परीक्षा केंद्रांनी विद्यार्थ्यांचा दैनंदिन उपस्थिती अहवाल परीक्षा लिंकवर अपलोड करावा तसेच कला संचालनालयाच्या higherartexam@gmail.com या ई-मेल वर सादर करावा.

परीक्षा केंद्रावर परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थी संख्येनुसार परीक्षेसाठी लागणारे आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी अभ्यासक्रमनिहाय प्रतिविद्यार्थी परीक्षा शुल्काच्या ३० % रक्कम परीक्षा केंद्रांचे अधिष्ठाता/प्राचार्य यांना कला संचालनालयाकडून परीक्षेपूर्वी अदा करण्यात येईल. त्यानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन परीक्षेसाठी लागणारे आवश्यक साहित्य खरेदी करावे.

(राजीव मिश्रा)
प्र. कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१) प्राचार्य, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला संस्था (सोबतच्या यादीप्रमाणे)

२) अधिष्ठाता, शासकीय कला संस्था. (मुंबई, नागपूर व औरंगाबाद)

३) प्राचार्य, सर्व अनुदानित कला संस्था. (सोबतच्या यादीप्रमाणे)

प्रत,

१) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक दोन, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

३) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर

४) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.

५) निवड नस्ती